केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम १०४ ते १०४-डी अन्वये वाहनांवर परावर्तक (Reflectors), रिफ्लेक्टीव्ह टेप्स (Reflective Tapes) आणि मागील बाजूस रियर मार्किंग प्लेट/टेप बसविणेबाबत.

**परिवहन आयुक्त कार्यालय,**
प्रशासकिय इमारत, ३रा व ४ था मजला,
डॉ. आंबेडकर उद्यानाजवळ, सरकारी वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

क्र. एमव्हीआर-०७१०/सीआर-१०११/का.२(४)/जा.क्र. 8866 दिनांक 29 JUN 2019

वाचा : १) केंद्र शासन अधिसूचना क्र.जी.एस.आर.७८४(ई), दि.१२/११/२००८.
२) केंद्र शासन अधिसूचना क्र.जी.एस.आर.२९१(ई), दि.२४/०४/२०१४.
३) शासन पत्र क्र याचिका ०२१९/प्र.क्र.३६/परि-२ दि.२१.०२.२०१९.

## परिपत्रक

केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम १०४ ते १०४-डी च्या तरतुदीनुसार AIS 089 व AIS 090 मानकांची पूर्तता करणारे मान्यता प्राप्त परावर्तक (Reflectors), रिफ्लेक्टीव्ह टेप्स (Reflective Tapes) आणि मागील बाजूस रियर मार्किंग प्लेट/टेप लावणे बंधनकारक आहे.

२ प्रतिबिंबित करणारे परावर्तक (Reflectors), रिफ्लेक्टीव्ह टेप्स (Reflective Tapes) आणि मागील बाजूस रियर मार्किंग प्लेट/टेप AIS 089 व AIS 090 मानकांचे पालन करणारे असावेत आणि हे सर्व रात्री वाहनांवर स्पष्टपणे दृश्यमान असावे तसेच उक्त उत्पादने केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम १२६ मध्ये नमूद चाचणी संस्थांपैकी कोणत्याही एका संस्थेद्वारे तपासणी प्रमाणपत्र (Test Certificate) तसेच उत्पादनाचे (Confirmity of Production) प्रमाणपत्र प्राप्त असावी तसेच उक्त दोन्हीही प्रमाणपत्रे वैध असणे आवश्यक आहे.

३. केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम १०४ ते १०४-डी नुसार परावर्तक (Reflectors), रिफ्लेक्टीव्ह टेप्स (Reflective Tapes) आणि मागील बाजूस रियर मार्किंग प्लेट/टेप लावण्यास आवश्यक असणाऱ्या वाहनांना बसविले असल्याची खात्री योग्यता प्रमाणपत्र तपासणीच्या वेळेस करुन त्यानंतरच योग्यता प्रमाणपत्र जारी करावे. कोणत्याही परिस्थितीत उक्त तरतुदीची पुर्तता न करणाऱ्या वाहनांस योग्यता प्रमाणपत्र जारी करण्यात येऊ नये. तसेच



Scanned by CamScanner

योग्यता प्रमाणपत्र चाचणीकरीता उक्त तरतुदीची पुर्तता न करता वाहन सादर केल्यास वाहनधारकांविरध्द तात्काळ दंडनीय कारवाई करण्यात यावी तसेच उक्त तरतुदीच्या पुर्ततेअंती वाहन चाचणीकरीता स्विकारण्यात यावे.

४. उक्त तरतुदींच्या कार्यक्षम अंमलबजावणीकरीता तसेच ऑनलाईन माहिती त्वरीत उपलब्ध होण्याकरीता वाहन ४.० प्रणालीवर मॉडयूल कार्यरत होईपर्यंत उत्पादकाने व अधिकृत वितरकाने **एमआयएस प्रणालीवर** जारी केलेल्या क्यूआर कोडसह इंस्टॉलेशन प्रमाणपत्रावरील कोड स्कॅन करुन अस्सलतेची खात्री करण्यात यावी. तसेच उक्त प्रणाली कार्यरत होईपर्यंत हस्त अभिलेखपध्दतीने पुढील नमून्यात रजिस्टरमध्ये अभिलेख नोंद घेण्यात यावी

| अ.क्र. | वाहन नोंदणी क्र. | वाहनाचा मेक व मॉडेल | परावर्तक, रिफ्लेक्टीव्ह टेप्स आणि मागील बाजूस रियर मार्किंग प्लेट/टेप बसविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | | | |

तसेच परिवहन आयुक्त कार्यालयामध्ये खालील नमून्यामध्ये उत्पादकांची नोंद घेण्यात यावी.

| अ.क्र. | परावर्तक, रिफ्लेक्टीव्ह टेप्स आणि मागील बाजूस रियर मार्किंग प्लेट/टेप च्या उत्पादकाचे नांव, मोबाईल क्र. व ई-मेल आयडी | उत्पादकाचा पत्ता | तपासणी संस्थेने जारी केलेल्या प्रमाणपत्राचा क्रमांक, दिनांक व वैधता (सीओपी) | एमआयएस प्रणाली उपलब्ध आहे किंवा नाही. (असल्यास तपशिल) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

तसेच क्षेत्रिय कार्यालयांनी परिवहन आयुक्त कार्यालयास खालील नमून्यामध्ये वितरकांची माहिती सादर करण्यात यावी

| अ.क्र. | परावर्तक, रिफ्लेक्टीव्ह टेप्स आणि मागील बाजूस रियर मार्किंग प्लेट/टेप च्या उत्पादकाचे नांव | अधिकृत वितरकाचे नांव व पत्ता मोबाईल क्र. व ई-मेल आयडी | व्यवसाय प्रमाणपत्राचा क्रमांक, दिनांक व वैधता | क्षेत्रिय कार्यालयाचे नांव |
|---|---|---|---|---|
| | | | | |

५. उत्पादक आणि अधिकृत विक्रेते वाहनांवर परावर्तक (Reflectors), रिफ्लेक्टीव्ह टेप्स (Reflective Tapes) आणि मागील बाजूस रियर मार्किंग प्लेट/टेप वाहनावर बसविल्यानंतर वाहन मालकांना इन्स्टॉलेशन प्रमाणपत्र जारी करतील. केवळ क्यूआरकोडसह ऑनलाइन जारी केलेले इन्स्टॉलेशन प्रमाणपत्र वैध मानले जातील योग्यता प्रमाणपत्र चाचणीच्यावेळी संबधित मोटार वाहन निरिक्षक यांनी अशा प्रमाणपत्रांची क्यूआरकोड स्कॅन करुन पडताळणी करणे आवश्यक आहे.



Scanned by CamScanner

६. मान्यता प्राप्त नसलेल्या अनधिकृत उत्पादकांचे परावर्तक (Reflectors), रिफ्लेक्टीव्ह टेप्स (Reflective Tapes) आणि मागील बाजूस रियर मार्किंग प्लेट/टेप बसविण्यात आलेली वाहने नोंदणीपूर्व तपासणी करीता तसेच योग्यता प्रमाणपत्र चाचणीकरीता कोणत्याही परिस्थितीत स्विकारण्यात येऊ नयेत.

(मा. परिवहन आयुक्त यांचे मान्यतेने)

स. बा. सहस्त्रबुद्धे

**(सतिश बा. सहस्त्रबुध्दे)**
**अपर परिवहन आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**प्रति:-** सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालय / सर्व उप प्रादेशिक परिवहन कार्यायल / सर्व प्रभारी अधिकारी सीमा तपासणी नाके.

**प्रत :-** मा.प्रधान सचिव, गृह विभाग(परिवहन), दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी.

**प्रत :-** अपर पोलीस महासंचालक(वाहतुक), महाराष्ट्र राज्य, जुने जकात घर, ४ था मजला, डि.डि. इमारत, शहिद भागसिंग मार्ग, मुंबई-४००००१ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

Scanned by CamScanner